ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ५ जून, १९६३ | अंक ११

## विविध माहिती

**मुंबई–आग्रा रस्त्यावरील पूल**—नाशिकजवळ गोदावरी नदीवर बांधण्यांत आलेल्या नव्या पुलाचें उद्घाटन हिंदुस्थान सरकारचे वाहतूक व दळणवळण मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनी केलें. ह्या पुलामुळें मुंबई–आग्रा रस्त्यावरील मोटारवाहतुकीला आतां नाशिक शहरांतून मार्ग काढावा लागणार नाहीं. पुलासाठी सुमारे १२॥ लाख रुपये खर्च आला असून त्यामुळें थेट वाहतुकीची सोय सुधारली आहे.

**उष्णतम प्रकाशकिरणाचा शोध**—अमेरिकेंतील वेस्टिंग हौस कॉर्पोरेशनच्या शास्त्रज्ञांनीं जगांतील उष्णांतउष्ण प्रकाशकिरणाचा शोध लावला आहे. हा प्रकाशकिरण न फाकणारा असून अतिशय सामर्थ्ययुक्त आहे. ठराविक मर्यादेपर्यंतच्या जाड पोलादी पत्र्याला दोन किंवा तीन सेकंदांत भोक पाडण्याची शक्ति ह्या किरणांत आहे. त्याच्या साह्यानें अवकाशप्रवासांतील कांहीं प्रश्न सुटण्यासारखे आहेत.

**दंडकारण्यांतील खनिज संपत्ति**—पूर्व पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या निर्वासितांची सोय करण्यासाठी दंडकारण्याचा विकास प्रामुख्यानें करण्यांत येत असला, तरी ह्या भागांत खनिज संपत्ति विपुल असल्याचें सांगण्यांत येत आहे. तिचा शोध लावण्यासाठी नियोजनसमितितज्ज्ञांची एक कमिटी नेमणार आहे. कमिटी दंडकारण्याच्या साधनसंपत्तीसंबंधीं अहवाल तयार करील.

**सूक्ष्म ध्वनिलहरींचा उपयोग**—रशियांतील शास्त्रज्ञांनीं सूक्ष्म ध्वनिलहरींचा उपयोग करणारीं कांहीं उपकरणें शोधून काढलीं आहेत. त्यांचा उपयोग वैद्यकीय व्यवसायांत व शेतीसाठी करण्यांत येऊं लागला आहे. अशा प्रकारच्या एका उपकरणाचा उपयोग शेत नांगरण्यासाठी करण्यांत येत आहे. ह्या पद्धतीमुळें पिकें रसरशीत व भरपूर येतात असा दावा करण्यांत येत आहे.

**नळगंगा धरणयोजना**—खामगांवपासून ३५ मैलांवर बांधण्यांत येत असलेल्या नळगंगा नदीवरील धरणाचें काम लवकरच पुरें होणार आहे. हें धरण मातीचें असून त्याची लांबी दीड मैल आहे. धरणाच्या बांधकामासाठी २॥ कोटी रुपये खर्च आला आहे. येत्या ऑक्टोबरपासून त्यांतून शेतीला पाणी पुरविण्यांत येऊं लागेल. पहिल्या वर्षी १० हजार एकर जमीन भिजवितां येईल.

**रेल्वे मार्गावरील फाटकें**—रेल्वे मार्गावर असणाऱ्या रस्त्यांवरील फाटकांमुळें होणारे अपघात कमी करण्यासाठी रेल्वेतर्फे एक योजना तयार करण्यांत आली आहे. रक्षक नसलेल्या अशा १९,००० फाटकांपैकी १,२०० फाटकांवर राज्यसरकारांच्या सहकार्यानें रखवालदार ठेवण्यांत येणार आहेत.

**पाण्याच्या टंचाईमुळें धोका**—हॉंगकॉंगच्या ३५ लाख लोकांना पाण्याच्या टंचाईमुळें उद्भवणाऱ्या धोक्याचा इषारा देण्यांत आला आहे. सध्यां ह्या वसाहतीला रोज तीन तास पाणीपुरवठा करण्यांत येतो. हा पुरवठा फारतर जूनअखेर करतां येईल. दरम्यान पाण्याच्या टंचाईमुळें पटकी, विषमज्वर, अतिसार, इत्यादि रोग फैलावण्याचा धोका उत्पन्न झाला आहे.

**दारुगोळ्याच्या पुरवठ्याचा करार**—भारताला ३ कोटी रुपयांचा दारुगोळा पुरविण्याच्या करारावर युगोस्लाव्हियानें सही केली आहे. ह्या दारुगोळ्याची किंमत रुपयाच्या चलनांत देण्यांत यावयाची आहे. सर्व किंमत ३ वर्षांच्या कालांत ६ हप्त्यांनीं चुकती करावयाची आहे. परतफेडीच्या अटीप्रमाणें देणें असलेल्या हप्त्यांच्या रकमेवर ३ टक्के व्याज आकारण्यांत येईल.

**जागतिक आरोग्यसंघटनेचें अंदाजपत्रक**—जागतिक आरोग्य-मंडळानें जागतिक आरोग्यसंघटनेचें १९६४सालचें अंदाजपत्रक मंजूर केलें आहे. अंदाजपत्रकांत ३ कोटी, ४० लाख, ६५ हजार डॉलर्सच्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. १९६३च्या अंदाजपत्रकांतील रकमेपेक्षा ही रक्कम १३ लाख, ६३ हजार डॉलर्सनीं अधिक आहे. आशिया व आफ्रिका खंडांतील देशांतून हिवतापाचें उच्चाटन करण्यासाठी मुख्यतः अधिक रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

**रेल्वेसाठी लाकडाच्या तुळया**—रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यासाठी लागणाऱ्या लांकडी तुळया पुरविण्याचा करार सिक्कीम सरकारनें भारतीय रेल्वेखात्याशीं केला आहे. कराराप्रमाणें येत्या ऑक्टोबरपर्यंत सिकिमचें जंगलखातें १२ हजार घनफूट लांकूड पुरविणार आहे. डोंगरावरील जंगलांतून लांकूड खालीं आणण्याचें काम बरेंच कष्टाचें असतें. तरीसुद्धां सिक्कीम दरसाल ५० हजार घनफूट लांकूड उत्पादन करूं शकतो.

**फ्रान्सच्या मिठाच्या धंद्याचा अभ्यास**—फ्रान्सच्या सरकारच्या आमंत्रणावरून भारतांमधील मिठाच्या धंद्याचें १० जणांचें एक प्रतिनिधिमंडळ फ्रान्समधील मिठाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी फ्रान्सला जाणार आहे. ह्या धंद्यांत भारतामधील परिस्थितीला अनुसरून यंत्रांचा किती व कसा उपयोग करतां येईल हें पाहण्याचा मंडळाचा उद्देश आहे.

**भूतानला जपानची मदत**—जलविद्युत्, औद्योगिक शक्ति, वाहतूक व एंजिनिअरिंग ह्या व्यवसायांतील ६ जपानी तंत्रज्ञ लवकरच भूतानला जाणार आहेत. ह्या क्षेत्रांतील कोणते धंदे भूतानमध्यें काढतां येतील त्याची पाहणी ते करणार आहेत. पाहणी पूर्ण करण्यास त्यांना ४ ते ५ आठवडे लागतील.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ५ जून, १९६३ | अंक ११

## विविध माहिती

**मुंबई-आग्रा रस्त्यावरील पूल**—नाशिकजवळ गोदावरी नदीवर बांधण्यांत आलेल्या नव्या पुलाचें उद्‌घाटन हिंदुस्थान सरकारचे वाहतूक व दळणवळण मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं केलें. ह्या पुलामुळें मुंबई-आग्रा रस्त्यावरील मोटारवाहतुकीला आतां नाशिक शहरांतून मार्ग काढावा लागणार नाहीं. पुलासाठी सुमारें १२॥ लाख रुपये खर्च आला असून त्यामुळें थेट वाहतुकीची सोय सुधारली आहे.

**उष्णतम प्रकाशकिरणाचा शोध**—अमेरिकेंतील वेस्टिंग हौस कॉर्पोरेशनच्या शास्त्रज्ञांनीं जगांतील उष्णांतउष्ण प्रकाशकिरणाचा शोध लावला आहे. हा प्रकाशकिरण न फाकणारा असून अतिशय सामर्थ्ययुक्त आहे. ठराविक मर्यादेपर्यंतच्या जाड पोलादी पत्र्याला दोन किंवा तीन सेकंदांत भोंक पाडण्याची शक्ति ह्या किरणांत आहे. त्याच्या साह्यानें अवकाशप्रवासांतील कांहीं प्रश्न सुटण्यासारखे आहेत.

**दंडकारण्यांतील खनिज संपत्ति**—पूर्व पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या निर्वासितांची सोय करण्यासाठी दंडकारण्याचा विकास प्रामुख्यानें करण्यांत येत असला, तरी ह्या भागांत खनिज संपत्ति विपुल असल्याचें सांगण्यांत येत आहे. तिचा शोध लावण्यासाठी नियोजनसमितितज्ज्ञांची एक कमिटी नेमणार आहे. कमिटी दंडकारण्याच्या साधनसंपत्तीसंबंधीं अहवाल तयार करील.

**सूक्ष्म ध्वनिलहरींचा उपयोग**—रशियांतील शास्त्रज्ञांनीं सूक्ष्म ध्वनिलहरींचा उपयोग करणारीं कांहीं उपकरणें शोधून काढलीं आहेत. त्यांचा उपयोग वैद्यकीय व्यवसायांत व शेतीसाठी करण्यांत येऊं लागला आहे. अशा प्रकारच्या एका उपकरणाचा उपयोग शेत नांगरण्यासाठी करण्यांत येत आहे. ह्या पद्धतीमुळें पिकें रसरशीत व भरपूर येतात असा दावा करण्यांत येत आहे.

**नळगंगा धरणयोजना**—खामगांवपासून ३५ मैलांवर बांधण्यांत येत असलेल्या नळगंगा नदीवरील धरणाचें काम लवकरच पुरें होणार आहे. हें धरण मातीचें असून त्याची लांबी दीड मैल आहे. धरणाच्या बांधकामासाठी २॥ कोटी रुपये खर्च आला आहे. येत्या ऑक्टोबरपासून त्यांतून शेतीला पाणी पुरविण्यांत येऊं लागेल. पहिल्या वर्षीं १० हजार एकर जमीन भिजवितां येईल.

**रेल्वे मार्गावरील फाटकें**—रेल्वे मार्गावर असणाऱ्या रस्त्यांवरील फाटकांमुळें होणारे अपघात कमी करण्यासाठी रेल्वेतर्फे एक योजना तयार करण्यांत आली आहे. रक्षक नसलेल्या अशा १९,००० फाटकांपैकी १,२०० फाटकांवर राज्यसरकारांच्या सहकार्यानें रखवालदार ठेवण्यांत येणार आहेत.

**पाण्याच्या टंचाईमुळें धोका**—हाँगकाँगच्या ३५ लाख लोकांना पाण्याच्या टंचाईमुळें उद्‌भवणाऱ्या धोक्याचा इशारा देण्यांत आला आहे. सध्यां ह्या वसाहतीला रोज तीन तास पाणीपुरवठा करण्यांत येतो. हा पुरवठा फारतर जूनअखेर करतां येईल. दरम्यान पाण्याच्या टंचाईमुळें पटकी, विषमज्वर, अतिसार, इत्यादि रोग फैलावण्याचा धोका उत्पन्न झाला आहे.

**दारुगोळ्याच्या पुरवठ्याचा करार**—भारताला ३ कोटी रुपयांचा दारुगोळा पुरविण्याच्या करारावर युगोस्लाव्हियानें सही केली आहे. ह्या दारुगोळ्याची किंमत रुपयाच्या चलनांत देण्यांत यावयाची आहे. सर्व किंमत ३ वर्षांच्या कालांत ६ हप्त्यांनीं चुकती करावयाची आहे. परतफेडीच्या अटीप्रमाणें देणें असलेल्या हप्त्यांच्या रकमेवर ३ टक्के व्याज आकारण्यांत येईल.

**जागतिक आरोग्यसंघटनेचें अंदाजपत्रक**—जागतिक आरोग्य-मंडळानें जागतिक आरोग्यसंघटनेचें १९६४सालचें अंदाजपत्रक मंजूर केलें आहे. अंदाजपत्रकांत ३ कोटी, ४० लाख, ६५ हजार डॉलर्सच्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. १९६३च्या अंदाजपत्रकांतील रकमेपेक्षा ही रक्कम १३ लाख, ६३ हजार डॉलर्सनीं अधिक आहे. आशिया व आफ्रिका खंडांतील देशांतून हिवतापाचें उच्चाटन करण्यासाठी मुख्यतः अधिक रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

**रेल्वेसाठी लाकडाच्या तुळया**—रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यासाठी लागणाऱ्या लांकडी तुळया पुरविण्याचा करार सिक्कीम सरकारनें भारतीय रेल्वेखात्याशीं केला आहे. कराराप्रमाणें येत्या ऑक्टोबरपर्यंत सिक्किमचें जंगलखातें १२ हजार घनफूट लांकूड पुरविणार आहे. डोंगरावरील जंगलांतून लांकूड खालीं आणण्याचें काम बरेंच कष्टाचें असतें. तरीसुद्धां सिक्कीम दरसाल ५० हजार घनफूट लांकूड उत्पादन करूं शकतो.

**फ्रान्सच्या मिठाच्या धंद्याचा अभ्यास**—फ्रान्सच्या सरकारच्या आमंत्रणावरून भारतामधील मिठाच्या धंद्याचें १० जणांचें एक प्रतिनिधिमंडळ फ्रान्समधील मिठाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी फ्रान्सला जाणार आहे. ह्या धंद्यांत भारतामधील परिस्थितीला अनुसरून यंत्रांचा किती व कसा उपयोग करतां येईल हें पाहण्याचा मंडळाचा उद्देश आहे.

**भूतानला जपानची मदत**—जलविद्युत, औद्योगिक शक्ति, वाहतूक व एंजिनिअरिंग ह्या व्यवसायांतील ६ जपानी तंत्रज्ञ लवकरच भूतानला जाणार आहेत. ह्या क्षेत्रांतील कोणते धंदे भूतानमध्यें काढतां येतील त्याची पाहणी ते करणार आहेत. पाहणी पूर्ण करण्यास त्यांना ४ ते ५ आठवडे लागतील.

### दि बेळगांव बँक लि.

दि बेळगांव बँक लि. ची जाहिरात "अर्था" मध्यें दि. १ मे रोजीं प्रसिद्ध झाली. त्यांत पांच वर्षांच्या मुदती ठेवीवरील व्याजाचा दर ५½% ( साडेपांच ) पर्यंत, असा चुकीनें छापला गेला होता; तो वास्तविक ५¼% ( सव्वा पांच ) पर्यंत, असा पाहिजे. ही दुरुस्ती करण्यासाठीं तीच जाहिरात दि. १५ रोजीं प्रसिद्ध केली. तथापि, ती दुरुस्ती होण्याची तर राहून गेलीच, पण ५ वर्षांच्या क्युम्युलेटिव्ह ठेवीवर ४½% ( साडेचार ) व्याजाचा दर हवा तो ५½% ( साडेपांच ) असा छापला गेला. ह्या अक्षम्य चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहों.

### शास्त्रीय विषयांचे पदवीधरच पाहिजेत, असें नाहीं

हिंद सरकारच्या निरनिराळ्या खात्यांनीं खात्यांसाठीं भविष्यकाळांत लागणाऱ्या तंत्रज्ञांच्या संख्येविषयीं गृहखात्याला माहिती पुरविली होती. त्यावरून असें दिसून आलें कीं शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांसाठीं फार मोठी मागणी आहे. पण पदवीपरीक्षेपर्यंतचें शिक्षण घेण्यास वेळ अधिक लागतो. म्हणून तांत्रिक स्वरुपाचीं विविध कामें आणि तीं करण्यासाठीं लागणारी शैक्षणिक पात्रता ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं गृहखात्यातर्फे चौकशी सुरू करण्यांत आली होती. चौकशीनंतर असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं अनेक तांत्रिक नौकऱ्यांसाठीं पदवीधरांचीच गरज आहे असे नाहीं. त्या त्या विषयांतील डिप्लोमा मिळविणारे लोकहि जरूर तीं कामें चांगल्या प्रकारें करूं शकतील.

### आसाममधील वन्य प्राण्यांचें रक्षण

आसाम राज्याचें वन्य प्राणी संरक्षक मंडळ वन्य प्राण्यांचें जीवन सुरक्षित राखण्यासाठीं एक अगर अधिक राष्ट्रीय उद्यानें स्थापन करण्याचा विचार करीत आहे. भारतामधील कोणत्याहि राज्यापेक्षा आसाममधील जंगलांत वन्य प्राण्यांची विविधता आढळून येते. ह्या प्राण्यांपैकीं कांहीं प्राणी आतां फारच थोडे राहिलेले आहेत. अशा प्राण्यांपैकीं शिंग असलेला गेंडा हा एक आहे. आशिआंतील ब्रह्मदेश सोडला तर इतर कोठल्याहि देशांत आसामइतके हत्ती सांपडत नाहींत. त्याशिवाय रानरेडा, बायसन, इत्यादि कचितच आढळणारे प्राणीहि आसाममधील अरण्यांत वास करतात. आसाममधील जंगलांतील ४ विभागांत वन्य प्राण्यांना मारण्याची बंदी करण्यांत आलेली आहे. तरीसुद्धां राष्ट्रीय उद्यानांमुळें आसामच्या जंगली जनावरांचें जीवन अधिक सुरक्षित होईल.

### सिकिममध्यें कागदाच्या लगद्याचा कारखाना

सिकिममध्यें गंगटोकपासून १८ मैलांवर कागद तयार करण्यासाठीं लागणारा लगदा तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्याच्या कामीं अमेरिकेचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. त्याच्या उभारणीसाठीं ७·५ कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रींपैकीं कांहीं भाग अमेरिका देणगी म्हणून देईल. कारखाना चालविण्यासाठीं जरूर असणारें लाकूड सिकिममध्यें विपुलतेनें उपलब्ध आहे. कारखान्याची रोजची उत्पादनक्षमता १०० टन लगद्याची असेल आणि त्यामुळें ५०० कामगारांना रोजगार मिळेल. कारखान्यासाठीं लागणारें लाकूड व इतर माल दोरखंडाच्या अंतराळीं पुलानें नेण्यांत येईल.

### भावनगर बंदराचा विकास

गुजरात राज्यसरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत सौराष्ट्रामधील भावनगर बंदराचा विकास करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ७५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. बंदरांतील कांहीं जागा खाजगी मालकांना देऊन त्यांना त्या ठिकाणीं स्वतःच्या मालकीचीं गुदामें बांधण्याची परवानगी देण्यांत येणार आहे. अहमदाबादमधील गिरण्यांना लागणारा अमेरिकन कापूस लवकरच भावनगर बंदरांत उतरून घेण्यांत येईल. भावनगर बंदराचा विकास पूर्ण झाल्यावर उत्तर गुजराथ व राजस्थान ह्या भागांतील आयात-निर्यातीच्या व्यापाराची जवळची व अधिक चांगली सोय होईल.


## Deccan Institute of Commerce

**717 Budhwar Peth, Opp. Jijamata Garden, Poona 2.**
**Opens for the New Year on Wednesday,**
**26th June, 1963.**

Students coached up for the G. C. D., D. Com., L. C. C., G. D. C. & A., Costing, Company Secretary, External Pre-Degree Commerce and B. Com. Degree, External Special B. Com. Degree, Accountancy, Shorthand, English-Marathi Typewriting and Bankers' Practical Training Course.

*Governmet Freeships for G. C. D., G. D. C. & A., Shorthand and Typewriting Courses to students having annual income of Rs. 1200/- and less.
*Morning and Evening classes.
*Medium of Instruction–English and Marathi.
*3 months Bankers' Practical Training Course for bank-employees and persons desirous to enter into Bank-service.

[ Prospectus at 20 n. P. ]

## Fergusson College, Poona 4,

The College will reopen on the 20th June, 1963. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examination are declared.

Poona
May 15, 1963. Principal

D. E. Society's

## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College will re-open on 20th June 1963 for the academic year 1963-64. Students seeking admission to Pre-Degree, F. Y., S. Y., and T. Y. B. Com. clasees should apply immediately. Forms of admission and copies of the prospectus are available in the College Office between 11 a. m. and 2 p. m. on all working days.

Principal

# अर्थ

बुधवार, ता. ५ जून, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी बँकिंगचा आढावा

### कर्जाच्या मागणीचे प्रमाणांत ठेवींत वाढ हवी

गेल्या दोन वर्षांत हिंदी बँकिंगनें उल्लेखनीय प्रगति केली असून त्यांचे कडील ठेवींत बरीच मोठी वाढ झाली आहे. बँकांच्या शाखा-वाढीच्या कार्यक्रमाचा तो एक परिणाम आहे. अकार्यक्षम आणि कमी मजबुतीच्या बँका मजबूत बँकांत विलीन केल्यामुळें बँकिंगचा व्यवसाय सुधारण्यास मदत झाली. डिपॉझिट इन्शुअरन्सच्या योजनेमुळें जनतेचा बँकिंगवरील विश्वास वाढूं लागला आहे.

ठेवी वाढल्या तरी कर्जाची मागणीहि वाढली आणि कर्जाचें ठेवींशीं पडणारें प्रमाण वाढत गेलें. १९६२ मध्यें तें सरासरीनें ७०% होतें; जास्तींत जास्त ७३% झालें होतें. कांहीं बँकांच्या बाबतींत तें प्रमाण ८०% पेक्षाहि अधिक आहे. साहाजिकच, तरत्या पैशाचें प्रमाण उतरलें. सप्टेंबर १९६४ पासून अमलांत यावयाचे निर्बंध कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत, तरीसुद्धां हें प्रमाण उतरण्याच्या ऐवजीं वाढलें आहे. लिक्विडिटीचें उद्दिष्ट गांठणें कित्येक बँकांना अतिशय जड जाणार आहे. ( सध्याचे किमान लिक्विडिटीचें प्रमाण २०% आहे, तें ह्यापुढें २८% होणार आहे—३% कॅश रिझर्व्ह + २५% इतर लिक्विड जिंदगी )

चिनी आक्रमणामुळें आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्यापासून हा प्रश्न बिकट झाला आहे. कारण, ठेवींची वाढ मंदावली आहे, पण कर्जाची मागणी वाढली आहे. संरक्षणाला आवश्यक अशा खर्चास प्राधान्य असल्यामुळें सरकारला जरूर तो पैसा आधीं उपलब्ध करू देणें भाग आहे. जे पैसे बँकांकडे ठेवींच्या रूपानें यावयाचे, ते आतां संरक्षण निधीकडे आणि संरक्षक रोख्यांचेकडे वळवले जात आहेत. संरक्षणविषयक उत्पादनाला आवश्यक तो कर्जपुरवठा करून मग औद्योगिक विकासाचा क्रम लागणार आणि त्यानंतरच बाकीच्यांना कर्जें मिळणार.

सुवर्णनियंत्रणामुळें, जो पैसा पूर्वी सोन्यांत गुंतविला जात असे, त्यांपैकीं कांहीं पैसा उत्पादक रीतीनें गुंतवला जाऊन त्याचा कांहीं अंश बँकांकडे ठेवींच्या रूपानें येऊं शकेल. बँकांच्या शाखावाढीस ह्या संबंधांत विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. विशेषतः आज बँक कचेऱ्या नाहींत अशा ठिकाणीं त्या उघडण्यांत येऊन ठेवी आकर्षण्यासाठीं आवश्यक ते प्रयत्न केले, तर ते फलदायी झाल्याविना राहणार नाहींत.

१९६२ मध्यें ठेवींत २३३ कोटी रुपयांची भर पडली; म्हणजे त्यांत १३·७% वाढ झाली. १९६१ मधील तत्सम आंकडे १६८ कोटी रुपये आणि १०% असे आहेत. सरकारनें तुटीच्या अर्थव्यवस्थेसाठी निर्माण केलेलें जादा चलन, बँकांच्या मुदती ठेवीवरील व्याजांत केलेली वाढ, बँक-शाखांची वाढ, बँकिंग सुधारण्यासाठी केलेले विविध प्रयत्न, इत्यादींचा तो परिणाम आहे. ह्याच मुदतींत बँकांनीं दिलेल्या कर्जांत १४६ कोटी रुपयांची ( ११·५% ) वाढ झाली. १९६१ चे तत्सम आंकडे १०६ कोटी रुपये आणि ९% असे होते. बँकांच्या कर्ज-मंजुरीवर बरींच बंधनें घालावीं लागलीं. साठेबाजी आणि सट्टेबाजी ह्याला पोषक होणारीं कर्जें परत मागविण्यांत यावीं आणि बिन-तारणाचीं कर्जें शक्य तो देण्यांत येऊं नयेत, असा बँकांना सल्ला देण्यांत आला.

### कांहीं निवडक शेड्यूल्ड बँकांचीं कर्जें व त्यांवरील व्याज

( आंकडे कोटी रुपयांचे )

| व्याजाचा दर | डिसेंबर १९६१ रक्कम | डिसेंबर १९६१ एकूणशीं प्रमाण % | डिसेंबर १९६२ रक्कम | डिसेंबर १९६२ एकूणशीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| २% पर्यंत | ३·४२ | ०·४ | ४·:० | ०-५ |
| त्यावर ३% पर्यंत | १·५४ | ०·२ | २·१६ | ०·२ |
| त्यावर ४% पर्यंत | २·३७ | ०·३ | १·२३ | ०·१ |
| त्यावर ५% पर्यंत | ११०·४३ | १२·५ | १२४·१३ | १२·४ |
| त्यावर ६% पर्यंत | ३३४·१० | ३७·८ | ३२९·१० | ३२·९ |
| त्यावर ७% पर्यंत | ३१०·३४ | ३५·२ | ३७७·९३ | ३७·८ |
| ७% चे वर | ११९·९८ | १३·६ | १५९·५४ | १६·० |
| एकूण | ८८२·१८ | १००·० | ९९८·८९ | १००·० |

### कर्जें आणि ठेवी ह्यांवरील व्याजाचे दरांतील मार्जिन

| वर्ष | कर्जावर मिळालेलें सरासरी व्याज % | ठेवीवर दिलेलें सरासरी व्याज % | दोहोंतील मार्जिन |
|---|---|---|---|
| १९५७ | ५·४४ | १·९४ | ३·५० |
| १९५८ | ५·५९ | २·२५ | ३·३४ |
| १९५९ | ५·६४ | २·१९ | ३·४५ |
| १९६० | ५·८९ | २·०१ | ३·८८ |
| १९६१ | ६·३३ | २·१२ | ४·२१ |
| १९६२ | ६·४१ | २·२७ | ४·१४ |

### ३२ प्रमुख शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९६१ | १९६२ |
|---|---|---|
| १. एकूण उत्पन्न | ८९·० | १०३·९ |
| व्याज व डिस्कौंट | ६९·८ | ८२·३ |
| इतर उत्पन्न | १९·२ | २१·६ |
| २. एकूण खर्च | ७७·७ | ९३·२ |
| दिलेलें व्याज | ३६·८ | ४३·९ |
| एस्टॅब्लिशमेंट खर्च | ३०·२ | ३६·० |
| इतर खर्च | १०·७ | १३·३ |
| ३. नफा | ११·२ | १०·७ |

# अर्थ

बुधवार, ता. ५ जून, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी बँकिंगचा आढावा

### कर्जाच्या मागणीचे प्रमाणांत ठेवींत वाढ हवी

गेल्या दोन वर्षांत हिंदी बँकिंगनें उल्लेखनीय प्रगति केली असून त्यांचे कडील ठेवींत बरीच मोठी वाढ झाली आहे. बँकांच्या शाखा-वाढीच्या कार्यक्रमाचा तो एक परिणाम आहे. अकार्यक्षम आणि कमी मजबुतीच्या बँका मजबूत बँकांत विलीन केल्यामुळें बँकिंगचा व्यवसाय सुधारण्यास मदत झाली. डिपॉझिट इन्शुअरन्सच्या योजनेमुळें जनतेचा बँकिंगवरील विश्वास वाढूं लागला आहे.

ठेवी वाढल्या तरी कर्जांची मागणीहि वाढली आणि कर्जाचें ठेवींशीं पडणारें प्रमाण वाढत गेलें. १९६२ मध्यें तें सरासरीनें ७०% होतें; जास्तींत जास्त ७३% झालें होतें. कांहीं बँकांच्या बाबतींत तें प्रमाण ८०% पेक्षाहि अधिक आहे. साहाजिकच, तरत्या पैशाचें प्रमाण उतरलें. सप्टेंबर १९६४ पासून अमलांत यावयाचे निर्बंध कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत, तरीसुद्धां हें प्रमाण उतरण्याच्या ऐवजीं वाढलें आहे. लिक्विडिटीचें उद्दिष्ट गांठणें कित्येक बँकांना अतिशय जड जाणार आहे. ( सध्याचे किमान लिक्विडिटीचें प्रमाण २०% आहे, तें ह्यापुढें २८% होणार आहे—३% कॅश रिझर्व्ह + २५% इतर लिक्विड जिंदगी )

चिनी आक्रमणामुळें आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्यापासून हा प्रश्न बिकट झाला आहे. कारण, ठेवींची वाढ मंदावली आहे, पण कर्जाची मागणी वाढली आहे. संरक्षणाला आवश्यक अशा खर्चास प्राधान्य असल्यामुळें सरकारला जरूर तो पैसा आधीं उपलब्ध करू देणें भाग आहे. जे पैसे बँकांकडे ठेवींच्या रूपानें यावयाचे, ते आतां संरक्षण निधीकडे आणि संरक्षक रोख्यांचेकडे वळवले जात आहेत. संरक्षणविषयक उत्पादनाला आवश्यक तो कर्जपुरवठा करून मग औद्योगिक विकासाचा क्रम लागणार आणि त्यानंतरच बाकीच्यांना कर्जें मिळणार.

सुवर्णनियंत्रणामुळें, जो पैसा पूर्वी सोन्यांत गुंतविला जात असे, त्यांपैकी कांहीं पैसा उत्पादक रीतीनें गुंतवला जाऊन त्याचा कांहीं अंश बँकांकडे ठेवींच्या रूपानें येऊं शकेल. बँकांच्या शाखावाढीस ह्या संबंधांत विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. विशेषत: आज बँक कचेऱ्या नाहींत अशा ठिकाणीं त्या उघडण्यांत येऊन ठेवी आकर्षण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले, तर ते फलदायी झाल्याविना राहणार नाहींत.

१९६२ मध्यें ठेवींत २३३ कोटी रुपयांची भर पडली; म्हणजे त्यांत १३·७% वाढ झाली. १९६१ मधील तत्सम आंकडे १६८ कोटी रुपये आणि १०% असे आहेत. सरकारनें तुटीच्या अर्थव्यवस्थेसाठी निर्माण केलेलें जादा चलन, बँकांच्या मुदती ठेवीवरील व्याजांत केलेली वाढ, बँक-शाखांची वाढ, बँकिंग सुधारण्यासाठी केलेले विविध प्रयत्न, इत्यादींचा तो परिणाम आहे. ह्याच मुदतींत बँकांनीं दिलेल्या कर्जांत १४६ कोटी रुपयांची ( ११·५% ) वाढ झाली. १९६१ चे तत्सम आंकडे १०६ कोटी रुपये आणि ९% असे होते. बँकांच्या कर्ज-मंजुरीवर वरीच बंधनें घालावीं लागलीं. साठेबाजी आणि सट्टेबाजी ह्याला पोषक होणारीं कर्जें परत मागविण्यांत यावीं आणि बिन-तारणाचीं कर्जें शक्य तो देण्यांत येऊं नयेत, असा बँकांना सल्ला देण्यांत आला.

**कांहीं निवडक शेड्यूल्ड बँकांचीं कर्जें व त्यांवरील व्याज**

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | डिसेंबर १९६१ | | डिसेंबर १९६२ | |
|---|---|---|---|---|
| व्याजाचा दर | रक्कम | एकूणशीं प्रमाण % | रक्कम | एकूणशीं प्रमाण % |
| २% पर्यंत | ३·४२ | ०·४ | ४·:० | ०-५ |
| त्यावर ३% पर्यंत | १·५४ | ०·२ | २·१६ | ०·२ |
| त्यावर ४% पर्यंत | २·३७ | ०·३ | १·२३ | ०·१ |
| त्यावर ५% पर्यंत | ११०·४३ | १२·५ | १२४·१३ | १२·४ |
| त्यावर ६% पर्यंत | ३३४·१० | ३७·८ | ३२९·१० | ३२·९ |
| त्यावर ७% पर्यंत | ३१०·३४ | ३५·२ | ३७७·९३ | ३७·८ |
| ७% चे वर | ११९·९८ | १३·६ | १५९·५४ | १६·० |
| एकूण | ८८२·१८ | १००·० | ९९८·८९ | १००·० |

**कर्जें आणि ठेवी ह्यांवरील व्याजाचे दरांतील मार्जिन**

| वर्ष | कर्जावर मिळालेलें सरासरी व्याज % | ठेवींवर दिलेलें सरासरी व्याज % | दोहोंतील मार्जिन |
|---|---|---|---|
| १९५७ | ५·४४ | १·९४ | ३·५० |
| १९५८ | ५·५९ | २·२५ | ३·३४ |
| १९५९ | ५·६४ | २·१९ | ३·४५ |
| १९६० | ५·८९ | २·०१ | ३·८८ |
| १९६१ | ६·३३ | २·१२ | ४·२१ |
| १९६२ | ६·४१ | २·२७ | ४·१४ |

**३२ प्रमुख शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च**

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९६१ | १९६२ |
|---|---|---|
| १. एकूण उत्पन्न | ८९·० | १०३·९ |
| व्याज व डिस्कौंट | ६९·८ | ८२·३ |
| इतर उत्पन्न | १९·२ | २१·६ |
| २. एकूण खर्च | ७७·७ | ९३·२ |
| दिलेलें व्याज | ३६·८ | ४३·९ |
| एस्टॅब्लिशमेंट खर्च | ३०·२ | ३६·० |
| इतर खर्च | १०·७ | १३·३ |
| ३. नफा | ११·२ | १०·७ |

---

## विद्यापीठें आणि लोकसंख्याविषयक प्रश्न

नियोजन-समितीचे सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनी बंगलोर येथें लोकसंख्याविषयक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या एका वासंतिक शिबिराचें उद्घाटन केलें. हें शिबिर तीन आठवडे चालणार असून दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ ह्या संस्थेतर्फे तें भरविण्यांत आलें आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम असून त्यासाठी ३२ विद्यापीठांकडून ३५ प्राध्यापक पाठविण्यांत आलें आहेत. त्याशिवाय सरकारचेहि पांच प्रतिनिधि आलेले आहेत. डॉ. राव आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत म्हणाले कीं, आर्थिक नियोजनाचा विचार करतांना लोकसंख्याविषयक प्रश्नांना महत्त्व प्राप्त होणें साहजिकच आहे. म्हणून विद्यापीठांनीं लोकसंख्याविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी मनापासून सहकार्य करणें आवश्यक आहे. लोकसंख्या-विषयक प्रश्नांबाबत संशोधन करण्यासाठी दिल्ली येथील संस्थेनें विद्यापीठांकडून योजना मागविल्या होत्या. परंतु, विद्यापीठांकडून ह्या कामीं उत्तेजक प्रतिसाद फारसा मिळाला नाहीं. उलट लोकसंख्या हा विषय गंभीरपणें अभ्यास करण्यासारखा आहे असें हिंदी अर्थशास्त्रज्ञांना वाटत नसल्याचें दिसून आलें. तथापि ह्या शिबिराच्या निमित्तानें लोकसंख्येच्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष असल्याचें दिसून आलें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

भारतामधील लोकसंख्येची वाढ आणि इतर देशांतील लोकसंख्येची वाढ ह्यांत फरक आहे. इतर कांहीं देशांतील लोकसंख्येची वाढ ही त्या देशांच्या आर्थिक विकासांत अडथळा उत्पन्न करणारी ठरली नाहीं. भारतांत मात्र लोकसंख्ये-च्या वाढमुळें आर्थिक विकास जखडल्यासारखा झाला आहे. गेल्या पंचवीस वर्षांत भारतामधील दरहजारीं मृत्यूचें प्रमाण निम-पटीपेक्षाहि कमी झालेलें आहे. सार्वजनिक आरोग्याची सोय सुधारल्याचा हा परिणाम आहे. उलटपक्षीं, दरहजारीं जननाच्या प्रमाणांत मात्र फारच थोडी घट झालेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतांत आर्थिक नियोजनाचें युग सुरू झालें आहे. त्या-मुळें दरडोई उपलब्ध असणाऱ्या सुखसोयींत भर पडलेली आहे ह्यांत शंका नाहीं. तरीसुद्धां लोकसंख्येची वाढ अतिशय मोठ्या प्रमाणांत झाल्यामुळें दरडोई वापरतां येण्यासारख्या साधनसंप-त्तीच्या उपलब्धतेंत घटच झालेली आहे. कारण, लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत साधनसंपत्तीची वाढ झालेली नाहीं. भारताच्या लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण खूपच कमी करण्यांत आलें पाहिजे आणि तेंहि अगदीं थोड्या अवधींत. ह्या दृष्टीनें लोकसंख्याविषयक धोरण ठरविण्यांत आलें पाहिजे. कुटुंबनियोजनाचें लोकांकडून स्वागत व्हावयाचें असेल तर त्यासंबंधींचे हेतु त्यांना स्पष्टपणें समजावून सांगण्यांत आले पाहिजेत. आर्थिक प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी आणि सामाजिक न्यायाची स्थापना होण्यासाठी कुटुंबनियोजनाची कशी आवश्यकता आहे तें लोकांना पटवून देण्यांत आलें पाहिजे. स्त्रियांना शिक्षण देऊन आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करूनहि लोकसंख्येच्या वाढीवर कांहीं प्रमाणांत नियंत्रण ठेवतां येणें शक्य आहे.

## कोळशाच्या वाहतुकीसाठी नवे रेल्वेमार्ग

भारतामधील कोळशाच्या खाणींचा विकास करण्यास मदत व्हावी म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत २०० मैल लांबीचे नवे रेल्वेमार्ग बांधण्यात येणार आहेत. ह्याशिवाय २,४५१ मैल लांबीचा रेल्वेमार्ग दुहेरी करण्यात येणार आहे. ह्यांपैकी ५२५ मैलांचे मार्ग विशेष महत्त्वाचे आहेत. ह्या मार्गा-वरील कोळशाची वाहतूक एकसारखी वाढत चाललेली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या मार्गांवरील वाहतुकीचा ताण बराच वाढणार असल्यामुळें आतांपासूनच मार्गांची दुहेरी वाहतूक करण्यासाठी जरूर असणाऱ्या प्राथमिक कामास आरंभ करण्यांत येणार आहे. सुमारें २२६ मैल लांबीचे नवे रेल्वे रस्ते बांधण्यास मान्यताहि मिळालेली आहे. औद्योगिक शक्तीचें उत्पादन करण्या-साठी भारतांत अजून कित्येक वर्षे कोळशाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करावा लागणार आहे. त्यामुळें कोळशाच्या वाहतुकीची व्यवस्था उत्तरोत्तर अधिक चांगली करणें भागच आहे. वाहतुकी-साठी नवीं रेल्वे एंजिनेंहि घ्यावीं लागणार आहेत. रेल्वेखात्यानें १९६३-६४ सालीं रुंद रुळावर चालणारीं १३३ नवीं एंजिनें घ्यावयाचें ठरविलें आहे. १९६४-६५ सालीं आणखी ५४ एंजिनें नव्यानें घेण्यांत येणार आहेत. कोळशाची वाहतूक करण्यासाठी मुद्दाम बांधण्यांत आलेल्या वाघिणी रेल्वेबोर्ड घेणार आहे. पुढील दोन वर्षांत अशा प्रकारच्या ८,५०० वाघिणी कोळसावाहतुकी-साठी वापरण्यांत येऊं लागतील. गेल्या दोन वर्षांत ७,५०२ वाघिणी रेल्वेखात्यानें घेतल्या. पूर्वींच्या वाघिणींच्या मानानें नव्या वाघिणींत अधिक कोळसा मावतो.

## कर्जाचा उपयोग करण्यांत किंमतीचा अडथळा

औद्योगिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी भारताला अनेक प्रगत देशांकडून कर्जें मिळत आहेत. ह्या कर्जांपैकी कांहीं 'मुक्त' असतात; म्हणजे त्यांचा उपयोग विशिष्ट योजनांसाठीच करावा अशी अट नसते. ह्या उलट, कांहीं कर्जांच्या बाबतींत त्यांच्या उपयोगासंबंधीं अटी घातलेल्या असतात. अशा सनिर्बंध कर्जांच्या उपयोगाबाबत अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होण्याचा संभव असतो. ह्याबाबत अलीकडे घडलेली एक घटना लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ब्रिटनमधील पोलादाच्या धंद्याचें एक प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें होतें. भारताला ब्रिटननें ३·५कोटी पौंड कर्ज अलीकडे दिलेलें आहे. हें कर्ज विशिष्ट योजनेसाठीच दिलें होतें असें नाहीं. कर्जाचा उपयोग करून ब्रिटनमध्यें पोलादाचा पत्रा विकत घेण्याची भारताची इच्छा होती. सुमारें २० लाख पौंड किंमतीचा पोलादाचा पत्रा भारताला संरक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी पाहिजे होता. ब्रिटनच्या पोलाद धंद्याच्या प्रतिनिधिमंडळानें भारताशीं ह्याबाबत वाटाघाटी केल्या. परंतु त्यांनीं सांगितलेल्या किंमती जबर वाटल्यामुळें भारतानें पोलाद घेण्याचें नाकारलें. पोलादाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत दर टनाचा २८ पौंड भाव असतां ब्रिटनच्या प्रतिनिधींनीं ४१ पौंड भाव सांगितला. भार-ताला तो न पटल्यामुळें ब्रिटिश प्रतिनिधि नव्या सूचना घेण्यासाठी वाटाघाटी सोडून मायदेशीं परत गेले. कर्जाच्या वापराबाबत अटी घालण्यांत आल्या तर अशा कर्जांचा उपयोग करणें अवघड कसें जातें, ह्याचेंच हें उदाहरण आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### संस्थानिकांचें स्थान बदललें

बडोदा संस्थानचे महाराज फत्तेसिंगराव गायकवाड निवडणुकीच्या एका प्रचारसभेंत बोलतांना म्हणाले कीं, गेल्या १६ वर्षांत हिंदुस्थानांतील माजी संस्थानिकांच्या जीवनांत आमूलाग्र बदल झालेला आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होण्यापूर्वी संस्थानांचे राजेरजवाडे फक्त कांहीं समारंभप्रसंगींच लोकांच्या नजरेला पडत असत. पूर्वी लोक त्यांच्याकडे येऊं पाहात असत; पण आतां मात्र संस्थानिक स्वतःच लोकांच्याकडे जात असल्याचें दृश्य दिसत आहे. लोकाभिमुख होण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत ते सामान्य नागरिकासारखे हिंडूंफिरूं लागले आहेत.

### बोकॅरो येथील पोलादाचा कारखाना

बोकॅरो येथें काढण्यांत येणारा पोलादाचा ४ था कारखाना चालविण्यासाठी एका नवीन कंपनीची स्थापना करण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. ह्या कारखान्याची उभारणी व कारभार हिंदुस्थान स्टील कंपनीकडे सोंपविणें शक्य नव्हतें. कारण, सार्वजनिक मालकीच्या विभागांतील पोलादाच्या कारखान्यांच्या विस्ताराचें काम कंपनीला पुरून उरण्यासारखें आहे. कारखाना अमेरिकेच्या मदतीनें उभारण्यांत येणार आहे. ह्या संबंधींच्या अहवालांत अमेरिकन तज्ज्ञांनीं कारखान्याच्या प्रारंभींच्या कांहीं वर्षांत कारभारांत अमेरिकन तंत्रज्ञांचा हात असावा असें सुचविलेलें आहे. कारखान्याच्या कार्यक्षमतेची घडी नीट बसवून देण्याच्या दृष्टीनें अमेरिकन तंत्रज्ञाचें नियंत्रण कांहीं काळ तरी अपरिहार्य आहे, असें सांगण्यांत येत आहे. ह्या दृष्टीनें कारखाना चालविण्यासाठी स्वतंत्र संघटनाच इष्ट मानण्यांत येत आहे.

### रशिया–चीन तडजोड कठीण

अमेरिकेच्या अतिपूर्व खात्याचे सेक्रेटरी मि. रॉजर हिल्समन ह्यांच्या मतानें रशिआचीं सूत्रें मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या हातीं व चीनचीं सूत्रें माओ-त्से-टुंग ह्यांच्या हातीं असेपर्यंत कम्युनिझमच्या प्रसारासंबंधींच्या कार्यपद्धतींत दोन्ही देशांत खरी तडजोड होणें कठीण आहे. चीनचा कम्युनिस्ट पक्ष हा रशियन कम्युनिस्ट पक्षापेक्षा जगापासून अधिक अलग पडलेला आहे. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाला जागतिक कम्युनिस्ट चळवळीचें पुढारीपण स्वतःकडे घेण्याच्या कल्पनेनें पूर्णपणें ग्रासलेलें आहे. ह्या परिस्थितींत खरी दिलजमाई जवळजवळ अशक्यच आहे.

### नेपाळमध्यें पाकिस्तानचें भांडवल

नेपाळमध्यें भांडवल गुंतवून कांहीं उद्योगधंदे काढण्याबद्दल पाकिस्तानकडून सूचना करण्यांत आल्या असून नेपाळचें सरकार त्यांचा विचार करीत आहे. उभयतां देशांत व्यापारासंबंधीं करार झाल्यापासून पाकिस्तानच्या भांडवलाच्या मदतीनें उद्योगधंदे काढण्याच्या कल्पनेस अधिक जोराची चालना मिळाली आहे. आतांपर्यंत म्हणजे सुमारें २ वर्षांपूर्वीपर्यंत नेपाळमध्यें फक्त हिंदी भांडवलच गुंतविलें जात होतें. दोन वर्षांपूर्वी एका इस्राएल कंपनीनें नेपाळच्या बांधकामाच्या धंद्यांत भांडवल गुंतविलें. इस्राएल कंपनीचें ४९ टक्के भांडवल आहे. नेपाळमधील सरकारी इमारतींचें बांधकाम कंपनी करीत असते. आतां पाकिस्तान सौंदर्यप्रसाधनांचा एक कारखाना काढण्याच्या विचारांत असून कापडाची एक बंद पडलेली गिरणीहि पुन्हा चालू करणार आहे.

### रेल्वेच्या सामानाच्या चोऱ्या

ईस्टर्न रेल्वेच्या डब्यांतील विजेचे दिवे व इतर सामान ह्यांच्या चोऱ्या मोठ्या प्रमाणावर झाल्यानें गेल्या मार्च महिन्यांत रेल्वेचें दर तासाला सरासरी ५० रुपये नुकसान झालें. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत ही नुकसानी अनुक्रमें दर तासाला ७२ व ६८ रुपये होती. कलकत्त्याच्या हावडा व सेल्डा ह्या औद्योगिक परिसरांत सामानाच्या चोऱ्या अधिक झालेल्या आहेत.

### खनिजांच्या उत्पादनांत वाढ

१९६२ सालीं भारतामधील खाणींतून १८७ कोटी रुपये किंमतीचीं खनिजें बाहेर काढण्यांत आलीं. १९६१ सालीं १६६ कोटी रुपये किंमतीचें उत्पादन झालें होतें. उत्पादनांत झालेली ही वाढ १२ टक्के आहे. कोळसा, सोनें, जिप्सम, चुनखडी व मीठ ह्यांच्या उत्पादनांत लक्षांत भरण्यासारखी वाढ झाली. १९६२ सालीं १३४ कोटी रुपये किंमतीच्या कोळशाचें उत्पादन करण्यांत आलें. खनिज संपत्तीच्या उत्पादनांत बिहारचा क्रमांक पहिला लागतो. बिहारमध्यें एकूण ७२ कोटी रुपयांचीं अथवा एकूण उत्पादनाच्या ३८·६ टक्के इतकीं खनिजें निर्माण करण्यांत आलीं. त्यानंतर पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश ह्यांचा क्रमांक लागतो. नंतर उत्पादनाच्या किंमतीच्या मानानें ओरिसा, आंध्र, म्हैसूर, महाराष्ट्र व गुजरात असा अनुक्रम लागतो.

### सहकारी औद्योगिक वसाहत

अहमदनगरमधील प्रमुख नागरिकांनीं पुढाकार घेऊन नगर शहराजवळ एक सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी भांडवल म्हणून २५ हजार रुपयांची रकम लवकरच गोळा करण्यांत येणार आहे. शहराच्या परिसरांत वसाहतीसाठी लागणारी जमीन विकत घेण्यांत येणार आहे. अहमदनगरच्या नगरपालिकेनें वसाहतीसाठी लागणारे रस्ते, पाणी व आरोग्याची व्यवस्था ह्यांची सोय करण्याचें मान्य केलें आहे.

### प्रवाशांना उत्तेजन देण्यासाठी

प्रत्येक राज्यसरकारला स्टेट ट्रॅन्सपोर्टच्या ५० मोटारींना अखिल भारतीय प्रवासाची परवानगी देण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली आहे. हिंदी प्रवाशांना देशांतर्गत प्रवास करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून हा निर्णय घेण्यांत आला आहे. मध्यम उत्पन्नाच्या गटांतील लोकांना प्रवास करण्यास सोपें जावें म्हणून देशांतील राजरस्त्यावर अनेक ठिकाणीं विश्रांतिस्थानें बांधण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामुळें मोटारीनें प्रवास करणाऱ्यांची चांगली सोय होईल.

### गुजरातमधील दंतवैद्यकाचें पहिलें कॉलेज

जून महिन्यांत गुजरात राज्यांतील दंतवैद्यकाचें पहिलें कॉलेज सुरू होणार आहे. कॉलेज सरकारी आहे. कॉलेजमध्यें दंतवैद्यकाचा पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम ठेवण्यांत येणार आहे. अहमदाबादच्या नव्या सिव्हिल हॉस्पिटलमध्यें कॉलेजची सोय करण्यांत येणार आहे. त्यांत ३० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था आहे. दंतवैद्यकाची पदवी घेतलेल्यांची भारतामधील संख्या ४१० असून त्यांपैकी २८ गुजरात राज्यांतील आहेत. दंतवैद्यकाचा डिप्लोमा घेतलेल्यांची संख्या ५६३ असून त्यांपैकी ३९ गुजरातमधील आहेत. गुजरातमध्यें दंतवैद्यांची वाढती गरज असून तीं नवीन कॉलेज भागवील अशी अपेक्षा आहे.

# THE BANK OF

Balance Sheet as at

| 31-12-1961 Rupees | CAPITAL & LIABILITIES | | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|---|
| | **1. Capital :** | | | |
| | AUTHORISED CAPITAL : | | | |
| 50,00,000 | 4,00,000 shares of Rs. 50/- each ... | | | 2,00,00,000—00 |
| | ISSUED AND SUBSCRIBED CAPITAL : | | | |
